**संविधान म्हणजे काय ?**

मला सांगा, तुम्ही आपल्या शाळेत कधीपण येतो ना? नाही?

कोणतेही शिक्षक कधीपण येऊन शिकवता ना? नाही?

तुम्ही कोणतेही कपडे घालून शाळेत येता ना? नाही?

परीक्षेला बसलं, नाही बसलं तरी चालतं. बरोबर ना? - नाही? मग?

म्हणजे आपल्या शाळेची वेळ ठरलेली आहे. शिक्षकांची पण वेळ ठरली आहे. कोणते विषय शिकायचे हे पण ठरले आहे. तुमच्यासाठी शाळेचा युनिफॉर्म ठरला आहे. परीक्षेचा काळ ठरला आहे. बरोबर? हे सगळे काय आहेत? – नियम आहेत. म्हणजे शाळा व्यवस्थित चालण्यासाठी आपण काय बनवतो? नियम बनवतो. एक शाळा चालवायची म्हणजे त्याला काही नियम आहेत, काही विचार आहेत. मग एवढ्या मोठ्या देशाला चालवण्यासाठी नियम, विचार पाहिजेत की नाही? पाहिजेत ना? ते नियम आणि विचार ज्या पुस्तकात आहेत ते पुस्तक म्हणजे **भारताचे संविधान**.

आपण ज्या देशात जन्माला आलो, ज्या देशाचं खातोय, ज्या देशात शिकतोय, ज्या देशात वाढतोय, ज्या देशात कमावतोय, तो देश ज्या पुस्तकावर चालतो, ते पुस्तक म्हणजे **संविधान**.

संविधानाचा कायदा देशात कधीपासून सुरू झाला माहित आहे? 26 जानेवारी 1950 ह्या दिवसापासून संविधानाप्रमाणे देशाचा कारभार सुरू झाला.

**तुम्हांला माहित आहे का?**

**भारतीय संविधान बनवण्यात जनतेने सुद्धा सहभाग घेतला आहे.**

○ संविधानाची कच्ची प्रत फेब्रुवारी 1948 साली **जनतेसाठी खुली** करण्यात आली. त्याची किंमत होती 1 रुपया. लोकांना सांगण्यात आलं – **"हे आहे तुमचे संविधान. वाचा, विचार करा, आणि तुमच्या सूचना आम्हाला पाठवा."**

आणि काय आश्चर्य! काही आठवड्यांत देशभरातून **7,635 सूचना** आल्या. म्हणजे साडे सात हजारापेक्षा जास्त.

○ या सूचना कुणी दिल्या होत्या? तर गावांतील शेतकरी, कॉलेजमधील प्राध्यापक, वकील, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, व्यापारी, महिला संघटना, धार्मिक नेते – म्हणजे **सर्व स्तरांतील लोकांनी** आपला आवाज संविधानापर्यंत पोहोचवला.

○ या सूचनांमध्ये कुणी *मूलभूत हक्कांवर भर दिला*, तर कुणी *स्त्रियांच्या समानतेची मागणी* केली. कुणी *कामगारांचे हक्क* मांडले, तर कुणी *धर्मस्वातंत्र्य* जपावे असा आग्रह धरला.

मग, संविधान बनवणाऱ्या सभेने काय केले? आलेल्या सूचना अशाच सोडून दिल्या का?

○ नाही. तर या सर्व सूचनांचा **मसुदा समिती आणि संविधान सभा सदस्यांनी बारकाईने अभ्यास** केला. त्यातील तब्बल **2473 दुरुस्ती प्रस्तावांवर चर्चा** झाली.

हे काम काही एका दिवसांचं नव्हतं – **महिनोनमहिने या सुचनांवर चर्चा झाली**. काही सूचना मान्य झाल्या, काही सूचना थोडेफार बदल करून सामील केल्या.


**संविधान तयार करण्यात लोकांनीही खूप रस दाखवला.** हे दिसून आले की संविधान सभेच्या चर्चांच्या बैठकीदरम्यान, **पाहुण्यांच्या गॅलरीत एकूण ५३,००० पेक्षा जास्त लोक** आले होते, जे संविधान बनण्याच्या प्रक्रियेकडे उत्सुकतेने पाहत होते.

○ अखेर, अनेक बदल, दुरुस्त्या, आणि चर्चेनंतर संविधान तयार झाले. - ज्याला तयार व्हायला तब्बल 2 वर्ष 11 महीने 17 दिवस लागले.

**म्हणजेच, आपले संविधान हे जनतेच्या सहभागाने साकारलेले आहे, जनतेच्या लोकांच्या आवाजाने घडलेले आहे.**

(आपल्या माहितीसाठी - प्रस्ताव फक्त जनतेच्या सुचनांवर आधारित नव्हते – त्यामध्ये उपसमित्यांचे अहवाल, सदस्यांचे वैयक्तिक प्रस्ताव, आणि अनेक तांत्रिक मुद्दे देखील होते.)

संविधानाच्या लोकांसाठी खुली केलेल्या प्रतीचा फोटो.



# आम्ही भारताचे लोक

भारतीय संविधान जवळजवळ पूर्णच झाले होते. पण अजूनही एक प्रश्न उरलेलाच होता. या ऐतिहासिक ग्रंथाच्या प्रस्तावनेची सुरुवात नक्की कशी करायची?

○ संविधान सभेत चर्चा सुरू होती. **H.V. कामथ** नावाचे सदस्य म्हटले म्हणाले –"सुरुवात 'In the name of God' – देवाच्या नावाने अशी करुया!"

○ आसामचे **रोहिणी कुमार चौधरी** म्हणाले, "देव नको, तर देवीच्या नावाने करुया. आमच्याकडे कामाख्या देवी खूप प्रसिद्ध आहे."

**कामथ** थोडे वैतागून म्हणाले, "देवाच्या नावाने करायला काय हरकत आहे?"

**चौधरी** म्हणाले, "देवीच्या नावाने करायला काय प्रॉब्लेम आहे?"

**सक्सेना** नावाचे सदस्य म्हणाले, "आपण गांधीजींच्या नावाने सुरुवात करू आणि संविधान गांधीजींना अर्पण करुया." पण गांधीजींना मानणाऱ्या लोकांनीच त्याला विरोध केला.

अनेकांनी स्पष्ट मत मांडलं, **"याची सुरुवात 'We the People of India – आम्ही भारताचे लोक'** अशा शब्दांनीच व्हायला हवी."

सभागृहात गोंधळ माजला. मतभेद तीव्र झाले. आता काय करायचं?

मग ठरलं, चला, मतदान करूया. सूचना अशी – "ज्यांना देव, देवी, गांधीजी हवे त्यांनी त्याला त्याला मत द्या आणि ज्यांना लोक हवेत त्यांनी 'लोकां'ना मत द्या!" मतदान पूर्ण झालं.

काय झालं असेल? आश्चर्य म्हणजे –देवाच्या बाजूने 41 मतं पडली आणि "आम्ही भारताचे लोक" या विचाराच्या बाजूने 68 मतं पडली.

○ त्याच क्षणी ठरलं – भारतातील **खरे मालक** कोण आहेत? - "आम्ही – भारताचे लोक!"

○ ही फक्त सुरुवात नव्हती, हा एक मोठा बदल होता. कारण त्या क्षणापर्यंत प्रत्येकजण स्वतःला "मी" म्हणूनच ओळखत होता – मी मराठी, मी पंजाबी, मी हिंदू, मी मुस्लिम, मी दलित, मी स्त्री, मी पुरुष… पण त्या दिवशी संविधानाने **त्या प्रत्येक 'मी'ला एकत्र करून "आम्ही" बनवलं.** आणि हाच आहे – भारतीय संविधानाचा आत्मा!

○ डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते –"संविधान आपल्याला काय देईल? कायदेमंडळ, सरकार, न्यायव्यवस्था – पण त्यात खरे **प्राण फुंकणारे शब्द** आहेत – **'आम्ही भारताचे लोक!'**

○ "हा देश सर्वांचा आहे – सर्व धर्मांचा, सर्व भाषांचा, सर्व जातींचा आहे, हीच विविधता – भारताची खरी ताकद आहे!" आजही भारतात 4000 पेक्षा जास्त समुदाय आहेत. पण हे संविधान आपली **सामूहिक ओळख** आहे. संविधान सगळ्यांना **समान अधिकार** देतं. **आम्ही भारताचे लोक ठरवणार** की हा देश कसा चालेल.

# सार्वभौम

सार्वभौम म्हणजे काय कुणी सांगू शकते का? चला आपण समजून घेऊ.

○ मला सांगा, तुमच्या घरात **भाजी बनवायची असेल तर** दररोज शेजारचे येतात आणि सांगतात, “आज तुम्ही अमूक तमूक भाजीच बनवायची.” बरोबर ना? मग कोण ठरवतं? घरातली लोकंच ठरवतात.

○ बरं, तुमच्या घरी कोणता **टीव्ही आणायचा असेल तर** गावच्या सरपंचाची किंवा मंत्र्याची परवानगी घेऊन यावी लागते. हो की नाही? नाही. बरं मग कोण ठरवतं? तुमच्या घरातील लोकंच ठरवतात.

○ आपल्या **शेतात काय पिकवायचे, किती पिकवायचे, कसे पिकवायचे** हे शेतकरी स्वतः ठरवतो. इतर शेतकरी येऊन त्याला सांगू शकत नाहीत की "तू हे पीक घे".

तुम्ही एकदम मस्त **चित्र काढले आणि रंगवायला सुरुवात केली**. कोणीही येऊन तुमच्या हातातून रंग घेऊन रंगवू शकतं का? तेव्हा तुम्ही ठरवता ना की कोणता रंग द्यायचा.

या सर्व उदाहरणांतून काय दिसतं? **आपला निर्णय आपणच घेतो.**

○ जसे आपला निर्णय आपण घेतो तसेच, देशाच्या पातळीवरचे सर्व निर्णय कोण घेणार? आपण भारताचे लोक. म्हणजेच याचा अर्थ काय? **आपला देश स्वतःचे निर्णय स्वतः घेईल.**

○ अमेरिका किंवा कुठलाही बाहेरचा देश आपल्याला सांगणार नाही की असा निर्णय घ्या म्हणून. म्हणजेच **बाहेरचा कोणताही देश आपल्या निर्णयात ढवळाढवळ करणार नाही.**

मग निर्णय कसा घेणार? एक व्यक्त घेणार की सर्व मिळून ठरवणार? - सर्व मिळून. देशाचे निर्णय घेताना सर्व लोकांचा विचार व्हायला पाहिजे, कारण हा देश सर्व जनतेचा आहे.

# समाजवाद

**समाजवाद** समजून घेण्यासाठी आपण काही उदाहरणे पाहूया.

असे समजा, **तुमच्या वर्गात 30 विद्यार्थी आहेत. खेळण्यासाठी बॅडमिंटनचे 2 च सेट आहेत.** तर शिक्षक काय करतील? कोणत्याही 4 मुलांना निवडतील आणि त्यांना सांगतील, "हे तुमचे आहे. तुम्हीच खेळायचं? दुसऱ्या कुणाला द्यायचं नाही?" असं सांगतील का? नाही. ते काय म्हणतील? "ह्या बॅडमिंटनवर सर्वांचा अधिकार आहे. प्रत्येकाने आळीपाळीने खेळायचं." **म्हणजेच विद्यार्थ्याला खेळायची समान संधी कशी मिळेल, कुणीही वगळले जाणार नाही याची काळजी ते घेतील.** बरोबर ना?

आता दुसरे उदाहरण - तुम्ही प्रवासाला निघालात आणि. तहान लागली की आपण काय विकत घेतो? पाण्याची बॉटल. बरोबर ना? **पाण्याची बॉटल किती रुपयांची असते? 20 रुपयाला 1 लीटर पाणी.** बरोबर?

आपल्याला दररोजच पाण्याची गरज असते. सर्व कुटुंब मिळून दिवसाला रोज किती लीटर पाणी वापरतो? असं समजू की आपण **दिवसाला 1000 लीटर पाणी** वापरतो. वर्षाचं किती लीटर पाणी झालं? **3,65,000 लीटर.** 20 म्हणजे 365 दिवसांचे 3,65,000 * 20 -> **73 लाख रुपये.**

बरं आता मला सांगा, जर आपण दिवसाला 1000 लीटर पाणी वापरत असू तर हे जे आपण पाणी वापरतो, त्यासाठी आपण प्रत्येक घराच्या मागे वर्षाला 73 लाख रुपये सरकारला देतो की नाही? नाही? मग आपण पाणी पट्टी किती भरतो? वर्षाला 1000 - 1200 रुपये.

मग हे आलं कुठून? एका लीटरला 20 रुपये आणि 365 हजार लीटर पाण्याला फक्त 1000 - 1200 रुपये. **एवढी कमी किंमत आहे ते एका शब्दामुळे. तो शब्द म्हणजे समाजवाद.**

जर **ग्रामपंचायतीने किंवा महानगरपालिकेने सुद्धा पाण्यासाठी असा रेट लावला तर चालेल का?** (आपल्या पद्धतीने सोपे शब्द वापरू शकता) नाही चालणार नाय़ कारण मग ज्यांच्याकडे खूप पैसा असेल फक्त त्यांनाच पाणी मिळेल.

अशावेळी **समाजवाद काय म्हणतो?** की हे असं चालणार नाही. इथल्या प्रत्येक व्यक्तीला जगण्याचा अधिकार आहे. **या देशातील पाणी, जंगल, जमीन, हवा ही नैसर्गिक संसाधने सर्व लोकांची आहेत, सर्व लोकांच्या मालकीची आहेत, तिचा वापर सर्व लोकांच्या हितासाठी झाला पाहिजे, विशेषत: गरिबांच्या!**

**देशातील प्रत्येक माणसाला चांगले जीवन जगण्यासाठी वीज, पाणी, शिक्षण, दवाखाने ह्या आवश्यक गोष्टी आहेत. त्या सर्वांना मिळाल्या पाहिजेत हे समाजवाद सांगते.**

# धर्मनिरपेक्षता

(कोणत्याही एका विद्यार्थ्याला/विद्यार्थिनीला जागेवर उभे करणे. शिक्षक त्याला उद्देशून बोलतात.)

**शिक्षक :** नेहा, समज तू तुझ्या वर्गाची मॉनिटर आहेस. तुझ्या हातात सर्व विद्यार्थ्यांचा वाढदिवस साजरा करण्याचा अधिकार आहे. ठीक आहे?

**विद्यार्थिनी :** ठीक आहे.

**शिक्षक :** तुझ्या एका मैत्रिणीचा वाढदिवस आहे. तू तिला वाढदिवस साजरा करण्याची परवानगी दिली. काही दिवसांनी वर्गातील अर्जुनचा वाढदिवस आला. तू त्याला म्हणतेस, "तू कबड्डी खेळतोस, म्हणून तुला परवानगी नाही." यावर तुमचे मत काय?

**विद्यार्थी :** हे बरोबर नाही केलं. जे कबड्डी खेळतात त्यांनाही तो अधिकार आहे.

बरोबर. म्हणजेच सर्व विद्यार्थ्यांना तो अधिकार आहे. कुणाच्या खेळावरून असा भेदभाव योग्य नाही.

आता दुसरे उदाहरण पाहूया. कल्पना करा, की खेळाच्या मैदानावर वेगवेगळे खेळ खेळण्याची ठिकाणे आहेत. फुटबॉल, क्रिकेट, कबड्डी, खो-खो अशा जागा आहेत.

1. फुटबॉलपटू, क्रिकेटपटू, कबड्डी, खो-खो या सर्व खेळाडूंना मैदान वापरण्याची **समान संधी** असेल की नाही?
2. प्रत्येक खेळाडू स्वतःचा **आवडता खेळ** निवडू शकतो की नाही? कोणी त्याला अडवणार नाही.
3. मैदानातील खेळाचे शिक्षक फक्त एकच खेळ खेळा असे म्हणतात का? म्हणजे एकच खेळ नाही.

त्याप्रमाणे, आपल्या देशात प्रत्येक नागरिकाला आपला आवडता धर्म निवडण्याचे स्वातंत्र्य आहे. आपला देश हा धर्मनिरपेक्ष आहे. याचा अर्थ ज्याला जो धर्म स्वीकारायचा? तो ssss स्वीकारा. नाही स्वीकारायचा? नका स्वीकारू. तुम्हांला वाटलं की तुमचा धर्म बदलायचा आहे. बदलू शकता की नाही? बदलू शकता. नाही बदलायचा? - नका बदलू. परत वाटलं तिसराच घ्यायचाय. घ्या. नाही घ्यायचा? नका घेऊ.

तुम्हांला धर्मात राहून धर्माचं आचरण करायचंय? करा. प्रचार करायचाय? करा. वाटलं धर्मात राहून काहीच नाही करायचं? नका करु.

तुम्हांला कुठला धर्म असेल किंवा नसेल पण.

(मुलांना विचारायचं) पण **देशाचा धर्म कुठला?** (मुलांची उत्तरे येतील. त्यावर प्रतिप्रश्न करायचा) **कुठं लिहून ठेवलंय?** (काही विद्यार्थी म्हणतील) **मानवता. कुठं लिहून ठेवलंय?**

मी बोलू. **देशाला धर्मच नाही.** आता तुम्ही विचारा, हे कुठं लिहून ठेवलंय? (प्रास्ताविका दाखवत) यात लिहून ठेवलंय.

**धर्मनिरपेक्षता सांगते माणूस जो पाहिजे तो धर्म स्वीकारू शकतो किंवा नाही पण. परंतु, देशाला कुठलाच धर्म नसतो.**

# गणराज्य

तुम्ही वेगवेगळे खेळ खेळता ना? कोणकोणते खेळ खेळता? क्रिकेट, कबड्डी, खो-खो असे अनेक.

**तुमच्या टीममध्ये तुम्ही कुणाला तरी कॅप्टन म्हणून निवडता ना?** हो. मग कॅप्टन निवडताना तुम्ही काय पाहता? त्या कॅप्टनचे आई किंवा वडील तो खेळ खेळतात की नाही? नाही. त्या कॅप्टनचे नातेवाईक खेळ खेळतात की नाही? नाही. मग आपण काय पाहतो तर तो व्यवस्थित खेळतो की नाही? तो सर्व टीमला सोबत घेतो की नाही? बरोबर?

चला दुसरा एक प्रश्न. **आपल्या देशाच्या राष्ट्रपती कोण आहेत?** द्रौपदी मुरमू.

त्यांचे वडील राष्ट्रपती होते ना? नाही मग आई असेल? आजी तरी असेलच. नाही? मग घरातला कोणीच राष्ट्रपती नसताना एक आदिवासी महिला या देशाची राष्ट्रपती बनू शकली. कशामुळं? फक्त संविधानामुळे. संविधानातल्या गणराज्य या शब्दामुळे.

**संविधान येण्यापूर्वी भारतात जनतेचे प्रतिनिधी कसे निवडले जायचे?** पूर्वी आपल्याकडे, राजा असायचा आणि राजा नंतर राज्य कोणाचं राज्य असेल हे लोकं ठरवायचे की आधीच ठरलेलं असायचं? तर आधीच ठरलेलं असायचं. कोण राजा व्हायचं? राजाची मुलगी, बरोबर? - नाही - मग कोण? तर राजाचा मुलगा!

आपण राजेशाही झुगारली आणि लोकशाही गणराज्य स्वीकारलं. म्हणजे **देशाचा प्रमुख, राज्याचा प्रमुख, शहर प्रमुख, गावाचा प्रमुख तसेच राष्ट्रपती या सर्वोच्च स्थानी असणारी व्यक्ती वंशपरंपरेने निवडली जात नाही तर ती लोकांकडून  निवडलेली जाते, याला म्हणतात गणराज्य.**

# स्वातंत्र्य

○ **स्वातंत्र्याचे महत्त्व** - Activity - 5 मिनिटांसाठी **तुमचे स्वातंत्र्य हिरावून घेणार** आहे. तुम्हाला काय मागायचं ते मागा. बरं, खेळायची सुट्टी हवी आहे - सुट्टी दिली, पण खेळता येणार नाही.

○ **विचार** - विचार करण्याचं स्वातंत्र्य म्हणजे काय? सोपी गोष्ट आहे. विज्ञानाचा नियम आहे बघा, आपण सगळे जेवण करतो? बरोबर, आता सांगा, जेवतं कोण? आपण. अन्न कोणाच्या पोटात जातं? - आपल्या. त्यातून शरीर चालवायला काय तयार होतं? - रक्त. रक्त कुठं जातं - मेंदूला. मेंदू काय करतो? - विचार. बरोबर ना?

○ म्हणजे खाणार कोण? आपण! मेंदू कोणाचा? आपला! विचार कोण करणार? आपण! मग हे भारताच्या संविधानात लिहून ठेवायची काय गरज आहे? तुम्ही कधी असा विचार केला होता का? **विचार करण्याचं स्वातंत्र्य असून आपण असा कधी विचार नाही केला.**

○ आणि, हे स्वातंत्र्य फक्त संविधानाच्या आत नाही, तर प्रस्ताविकेत लिहून ठेवलंय की या देशातल्या लोकांना विचार करायचं स्वातंत्र्य असेल. का ठेवलं असेल असं?

○ मला सांग, **तू किती शिकली आहेस**? तुझी आई किती शिकली? आजी? त्यांच्या आया शाळेत गेल्या नव्हत्या. का गेल्या नव्हत्या? परिस्थिती नव्हती, शाळा नव्हत्या. शाळेत जायचा अधिकारच नाही, कारण असा नियमच होता की महिलांनी शाळेत जायचा विचार सुद्धा करायचा नाही! याउलट संविधान काय म्हणतंय? कुठे काहीही लिहिलेलं असेल, पण आपण मात्र विचार करू शकतो.

○ **अभिव्यक्ती** - जो विचार करतो, तो मांडण्याचे स्वातंत्र्य आहे.

○ **विश्वास** - ठेवायचा आहे, ठेवा, नसेल ठेवायचा, नका ठेवू.

○ **श्रद्धा** - बाळगायची आहे, बाळगा, नसेल बाळगायची, नका बाळगू.

○ **उपासना** - करायची, करा, नसेल करायची, नका करू.

○ म्हणजे संविधानाने आपल्याला बोलण्याचं, खाण्याचं, फिरण्याचं स्वातंत्र्य दिलं आहे. भाषा, पोशाख, अन्न, श्रद्धा, पूजा-व्रत, सण-उत्सव, कला (नृत्य, संगीत, चित्रकला), सामाजिक मूल्यं, परंपरा, व्यवसाय यांचे प्रत्येकाला त्याच्या आवडी निवडी प्रमाणे जगण्याचं स्वातंत्र्य आहे - कोणीच कोणावर जबरदस्ती करू शकत नाही.

○ **हाताची activity** - चला, आता एक काम करुयात. मी सां तसं करुयात. सगळ्यांनी हात वर करा. साईडला करा. खाली करा. आता बघा, हात वर करायचं, खाली करायचं स्वातंत्र्य होतं. घेतलं. साईडला करायचं स्वातंत्र्य होतं. घेता आलं नाही, कारण मुलं बसलेली होती. मग आपण काय केले? आपण हात आखूड केले. कोणी हात धरले होते का आपले? नाही. मग आपल्याला स्वातंत्र्य घेण्यापासून कोणी रोखलं. आपणच आपले हात आखूड केले, का, कारण आपण दुसऱ्याची काळजी घेतली. म्हणजे आपल्याला स्वातंत्र्य आहे पण त्याला मर्यादा सुद्धा आहेत. आपल्या स्वातंत्र्याने दुसऱ्याला इजा किंवा त्रास होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे.

★ **चॉकलेट Activity –** माझ्या हातात काही चॉकलेट आहेत. ज्याला पाहिजे तेवढ्या घ्या. फक्त लगेच खाऊ नका. थोड्या वेळाने खा. (मुलं घेतात.) तुम्ही खाऊ शकता परंतु यापैकी एका चॉकलेटमध्ये वीष आहे. (मुलं घाबरतात.) याचा अर्थ तुम्हांला चॉकलेट घेण्याचे स्वातंत्र्य आहे परंतु, भीतीच्या वातावरणात स्वातंत्र्यावर मर्यादा येते.

# बंधुता

आपल्या घरी बाहेरून कुणी आलं तर आपण त्यांना काय देतो? **एक ग्लास पाणी**. बरोबर? कारण तुमच्या मुख्याध्यापकांनी असा नियम करुन ठेवलेला आहे की कुणीही पाहुणे आले की पहिले 1 ग्लास पाणी द्या.

बरं याचं उत्तर सांगा. काही सण असेल, उत्सव असेल आनंद झाला असेल तर घरी काहीतरी **गोडधोड बनवले जाते की नाही?** मग आपण काय करतो? एखादी वाटी किंवा ताट शेजारच्या घरी देतो की नाही? देतो. त्याचे कारण सरपंच/मंत्री यांनी लिहून ठेवलेलं आहे की (नाटकी आवाजात) तुमच्या घरी गोडधोड बनवल्यावर एक वाटी शेजारच्या घरी द्यावी. बरोबर? नाही. म्हणजे **आपण हे मनापासून करतो.**

**कोणाकडे मयत झाली तर** त्या घरी जेवण बनतं? - नाही. आजूबाजूचे लोकं जेवण आणून देतात. हीच तर बंधुता आहे. आपल्या रोजच्या जीवनात बंधुतेची अनेक उदाहरणे घडत असतात.

**तुम्ही काय करता ते सांगा** – 1) वर्गात एखादा नवीन विद्यार्थी आला तर? 2) तुमच्या एखाद्या मित्राने/मैत्रिणीने जेवणाचा डबा आणला नाही तर? 3) कुणाला काही लागल्यावर आपण काय करतो? 4) एखाद्याचं पडलेलं पाकीट सापडलं? 5) बसमध्ये एखादी म्हातारी व्यक्ती आली आणि  जागा नसेल तर?

**’तू’ आणि ’मी’ या भावनेपेक्षा ’आपण’ या भावनेने वागणे म्हणजे बंधुता होय. त्यात दुसऱ्यासाठी काळजी, प्रेम, मदत येते.**

हे बघा, आपल्या स्वातंत्र्यात कुणी अडचण आणली तर आपण **तक्रार करू शकतो**. कुणी आपल्यासोबत समानतेने वागलं नाही तर आपण तक्रार करू शकतो. **पण कुणी आपल्याशी बंधुतेने - म्हणजेच प्रेमाने, आपुलकीने वागलं नाही तर आपण तक्रार करू शकतो का?** नाही.

बघा, म्हणजे **बंधुता कायद्याच्या चौकटीत बसवली जाऊ शकत नाही, ती मनातून यावी लागते.**

# समानता

**दर्जाची व संधीची समानता संविधानात आहे**. सुरुवातीला **दर्जाची समानता** पाहू.

"मुलगी मोटारसायकल चालवू शकते का?" हो. नक्की? तुम्ही पाहिलेय का? हो.
माझा एक मित्र म्हणतो की फुटबॉल फक्त मुलांसाठीचा खेळ आहे. हे बरोबर आहे का? का बरोबर नाही?
कोणताही विद्यार्थी इंजिनिअर होवू शकतो की नाही? का फक्त काही कुटुंबातील? सर्वच ना?

- इथं बसलेल्यांपैकी असं कुणी आहे का की जे तोंडातून जन्माला आलंय? नक्की नाही ना. बरं म्हणजे सगळे जण आईच्या पोटातूनच जन्माला आलेत. बरोबर? म्हणजेच आपण सर्वजण जन्माने समान आहोत. प्रत्येकाच्या शरिराची ठेवण सारखीच आहे ना? म्हणजे हात, पाय, डोळे, कान, नाक यांची रचना. **जातीनुसार, धर्मानुसार शरिराची रचना बदलते?**

**त्यामुळे कुणासोबतही जातीमुळे, धर्मामुळे, राहण्याच्या ठिकाणावरुन, लिंगानुसार, गरीब आहे की श्रीमंत यावरुन भेदभाव होवू नये. कुणालाही अपमानास्पद वागणूक मिळू नये, म्हणजे दर्जाची समानता.**

**संधीची समानता -** परंतु फक्त दर्जाची समानता असून चालत नाही. कसं ते बघू. ही गोष्ट ऐका - एकाच गावात चिन्मय आणि राहूल हे दोन मित्र राहतात. चिन्मयचे वडील मोठे व्यापारी आहेत. तर राहूलचे वडील कोरडवाहू शेतकरी आहेत. (कोरडवाहू म्हणजे पाण्याशिवाय शेती). दोघेही अभ्यासात हुशार आहेत. दोघांनाही डॉक्टर व्हायचं आहे. तर दोघांपैकी कोण डॉक्टर होवू शकतं? - चिन्मय. का बरं? - कारण त्याची ऐपत आहे. आणि राहूल? - तो नाही होवू शकत. का बरं? कारण तो गरीब आहे.

- म्हणजे माणूस म्हणून दोघेही सारखेच आहेत. पण संधीची समानता आहे का? - नाही. मग ती कशी मिळेल? - म्हणूनच **राहूलसारख्या गरीब विद्यार्थ्यांसाठी सरकार शिष्यवृत्ती देतं. म्हणूनच आपल्याकडे सरकारी मेडिकल कॉलेज उभे केले आहेत. हे सर्व कुणामुळे शक्य झालं? संविधानामुळे.** याच नियमानुसार पिढ्यानपिढ्या वंचित ठेवलेल्या घटकासाठी संविधानाने आरक्षणाची तरतूद केली आहे.
- संविधानाने संधीची समानता सर्वांना आहे असं मूल्य प्रस्थापित केल्यामुळे एक आदिवासी महिला देशाची राष्ट्रपती होऊ शकते.